C202600001

# DISTRICT & SESSIONS COURT, KOLHAPUR

## CIVIL / CRIMINAL CASE FILING FORM

| | |
|---|---|
| Case Type | CIVIL SUIT |

### APPLICANTS / COMPLAINANT DETAILS

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Name | ABHIJIT | | | | | |
| Father / Mother / Husband | PRABHAKAR JOSHI | | | | | |
| Address | | | | | | |
| Sex | Male | ✓ | Female | | Age | 57 |
| Nationality | Indian :- If other Mentioned | | | | Indian | ✓ |
| E- Mail Address | bbkurane196 @gmail | | Phone No. / Mobile No. | | | Fax No. : |
| Subject | Injunction | | | | | |
| Advocate Code | MH 1028/02 | | Advocate Name : Bhikaji B. Kurane / Mobile No. 9890246824 | | | |

### ACCUSED / OPPONENT DETAILS

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| Name | PANDURAG | | | | | |
| Father / Mother / Husband | BHIKAJI CHAWAN. | | | | | |
| Address | K. Sangaon Tal. Kagal. Dist Kolhapur | | | | | |
| Sex | Male | ✓ | Female | | Age | 44 |
| Nationality | Indian :- If other Mentioned | | | | Indian | ✓ |
| E- Mail Address | --------- | | Phone No. / Mobile No. | | | Fax No. : |
| Subject | | | | | | |
| Advocate Code | | | Advocate Name : / Mobile No. | | | |

### POLICE STATION DETAILS

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Police Station | | Fir No. | | Year | |
| Trail (tick one) | Session | Regular | Summary | | |
| Complaint (tick one ) | Police Chailan | Private Complaint | | Date of offence | / /20 |

### LOWER COURT DETAILS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Court Name | | | | |
| Case No. | | Decision Date | | / /20 |

### MAIN MATTER DETAILS

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Case Type | Bail | Case No. | Year | 20 |

### FOR OFFICE USE ONLY

| | | | |
|---|---|---|---|
| Objection Redrassal Date : / /20 | | Objection Compliance Date :- / /20 | |
| Registration No. | | Registration Date : / /20 | Listing Date : / /20 |
| Court Allotters | | Allocation Date :- / /20 | |

Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.03.11 17:09:40 +0530

MADKE AJIT BHISHMA

Presented by

RCS 32/2026
Exh. 1

दैनिक रजि. नं.                                        रे.क.नंबर   /२०२६

दाखल ता.   /०१/२०२६ .

मे. दिवाणी न्यायाधीशसो क. स्तर  कागल,

यांचे कोर्टात.....

१. अभिजीत प्रभाकर जोशी
व.व. ५७, धंदा- शेती,
रा. शाहुपार्क, राजेंद्रनगर,
पाण्याच्या टाकीजवळ,  कोल्हापूर
} वादी

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

Order
Issue suit summons to the defendants for the filing of written statement, documents and settlement issues. The defendants shall file the same within 30 days of service of suit summons.
Date : 11/03/2026   C.J.J.D.,Kagal

| | |
|---|---|
| २. संजय कृष्णराव जोशी<br>व.व. ६३, धंदा- शेती/ नोकरी,<br>रा. प्लॉट नं. २५४, सेक्टर नं. २१,<br>निगडे प्राधिकरण, पुणे<br>तर्फे व. मु. अभिजीत प्रभाकर जोशी<br>व.व. ५७, धंदा- शेती,<br>रा. शाहुपार्क, राजेंद्रनगर,<br>पाण्याच्या टाकीजवळ, कोल्हापूर | वादी |

विरुध्द

| | |
|---|---|
| पांडुरंग भिकाजी चव्हाण<br>व.व. ४४, धंदा- शेती,<br>रा. कसबा सांगाव, ता. कागल,<br>जि. कोल्हापूर. | प्रतिवादी |

<u>दावा - स्पेसिफिक रीलीफ ॲक्ट कलम ३४, ३७ व ३८ प्रमाणे हक्कज्ञापन होवुन मिळणेसाठी व कायम मनाईची ताकीद</u>

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

होवुन मिळणेबाबत दाव्याची आकारणी रक्कम रुपये ३०००/-.

यातील वादी मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते पुढीलप्रमाणे

१. दावा मिळकतीचे वर्णन -

तुकडी व जिल्हा कोल्हापूर, पोट तुकडी व तहसील कागल, मौजे कसबा सांगाव गावचे हद्दीतील भुमापन गट क्र. ३१७ याचे एकुण क्षेत्र हे. १०.९६ आर पोटखराबसह, आकार रु. १०.२७ पै. या मिळकती पैकी प्रतिवादी यांनी खरेदी केलेली हे. ०.८० आर क्षेत्राची मिळकत याचा आकार रु. ०.७७ पै. यांसी चतु:सिमा -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | याच मिळकतीमधील मिरजे यांची मिळकत. |
| पश्चिमेस | - | भु. गट नं. २६१ ची मिळकत |
| दक्षिणेस | - | याच मिळकती पैकी पुर्नवसनकरीता संपादित केलेली मिळकत. |
| उत्तरेस | - | याच मिळकती पैकी गोपाळ रामा पताडे यांची मिळकत. |

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

येणेप्रमाणे चतु:सिमेतील वर्णनाची मिळकत ही या दाव्याचा विषय असुन सोईसाठी येथुन पुढे तिला " **सदर मिळकत** " असे संबोधणेत आलेले आहे.

२. वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही यातील प्रतिवादी यांनी मिळकतीचे मूळ मालकांचेकडुन खरेदी केलेली मिळकत असून सदरची मिळकत ही यातील प्रतिवादी यांची स्वकष्टार्जित मिळकत होती. प्रतिवादी यांना त्यांचे कौटुंबिक व आर्थिक अडचणीपोटी सदरची मिळकत विक्री करावयाची असलेने यातील वादी यांनी खरेदी विक्रीचा व्यवहार निश्चित करुन सदर मिळकती संदर्भात प्रतिवादी यांचे बरोबर दि. १०/०१/२०१९ इ. रोजी रक्कम रु. ८,००,०००/- स्वीकारुन संचकारपत्र करुन दिलेले होते.

३. वादी यांनी प्रतिवादी यांना करुन दिले संचकारपत्रास आधीन राहुन दि. ०८/०९/२०२१ इ. रोजी रजिस्टर दस्त नं. १९९०/२०२१ ने उर्वरित रक्कमे पैकी रक्कम रु. २०,००,०००/- स्वीकारुन वादी यांनी प्रतिवादी यांना रजिस्टर साठेखत करुन दिलेले आहे. त्याचदिवशी दि. १०/०१/२०१९ इ. रोजी केलेले मुळ संचकारपत्र प्रतिवादी यांनी आपले कब्जात घेवुन वर नमूद केल्याप्रमाणे रजिस्टर दस्त करुन दिले आहेत. दावा

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

मिळकतीचे निश्चित केले व्यवहारापोटी प्रतिवादी यांना एकुण रक्कम रु. २८,००,०००/- (रक्कम रुपये अठ्ठावीस लाख फक्त) सदरची रक्कम ही वादी यांनी प्रतिवादी यांना त्यांचे बँक खातेवरुन चेकने व डीडीने अदा केलेली आहे. त्याचदिवशी प्रतिवादी यांनी वादींना कधीही रद्द न होणारे कपल्ड विथ इंटरेस्टने वटमुखत्यारपत्र करुन दिले असुन सदर वटमुखत्यारपत्राआधारे प्रतिवादींनी दावा मिळकती संदर्भात सर्व ते अधिकार वादींना दिलेले होते. वादी यांनी दावा मिळकत खरेदी करणेचे कारणास्तव प्रतिवादी यांना वेळोवेळी विचारणा करुनही प्रतिवादी यांनी वादींना खरेदीपत्र करुन देणेचे कारणास्तव माझी आवश्यकता नाही मी तुम्हांला दिले कपल्ड विथ इंटरेस्टचे वटमुखत्यारपत्राआधारे माझी उर्वरित देय रक्कम रु. १,००,०००/- देवुन खरेदीपत्र पुर्ण करुन घ्या असे सांगितले. त्यावेळी वादी यांनी प्रतिवादी यांना त्यांचे खाते असले बँकेतून दि. ०७/०३/२०२२ इ. रोजी आर. टी. जी. एस. ने रक्कम रु. १,००,०००/- प्रतिवादी यांचे खातेवरती ट्रान्स्फर करुन दावा मिळकतीचे खेरदीपत्र दि. १०/०३/२०२२ इ. रोजी रजिस्टर दस्त नं. ६३२/२०२२ ने पुर्ण करुन घेतले आहे.

४. वादी यांना दावा मिळकतीचा मालकीहक्काचा कब्जा खरेदीपत्राअन्वये प्राप्त झाला असुन त्यानंतर दावा मिळकत ही

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

सर्वसाधारणपणे साडे तीन वर्षे वादी यांचेच कब्जेवहिवाटीस होती. सदरची बाब ही प्रतिवादी यांना माहित असुनही वादींच्या असलेल्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी दि. २०/१२/२०२५ इ. रोजी हरकत, अडथळा करुन सदरची मिळकत प्रतिवादी यांनी वादींना कसणेस मज्जाव केला आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी राहत असलेल्या गावामध्ये असले कारणाने तसेच, प्रतिवादी हे राजकिय वर्धास्त असणारे इसम असुन प्रतिवादी यांच्या अर्दांड व हेक्केखोर वृत्तीची वादी यांना साधार भिती असलेने वादी यांनी सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांचे दहशतीचे कारणास्तव जाणे बंद केले आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी दरम्यानच्या कालावधीमध्ये ७/१२ पत्रकी असले नावचा गैरफायदा घेवुन त्रयस्थ इसमांचे बरोबर सदर मिळकतीचे अनुषंगाने व्यवहार करणेचे नाकारता येत नाही. वादी यांनी सदर मिळकतीचे संचकारपत्र करते वेळी दावा मिळकती संदर्भात कोणा बरोबरही कोणत्याही प्रकारचा व्यवहार केले नसलेचे निदर्शनास आले नंतरच वादी यांनी प्रतिवादी यांचे बरोबर सदर मिळकतीचा खरेदी करणेच्या उद्देशाने संचकारपत्र केले होते. त्याकारणाने सदर मिळकती संदर्भात संचकारपत्राचे दिनावधीपासून आजअखेर त्रयस्थ इसमांचे बरोबर व्यवहार केले असलेस ते वादींचे हक्कांवर

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

बंधनकारक नाहीत असे हक्कज्ञापन होवुन मिळणेबाबत तसेच, दावा मिळकतीची वादींना दि. १०/०३/२०२२ इ. रोजीचे खरेदीपत्राअन्वये प्राप्त झालेल्या मालकीहक्काच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी दि. २०/१२/२०२५ इ. रोजी हरकत, अडथळा केला असलेने प्रतिवादी अगर त्यांचे तर्फे अन्य इसमांनी वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करु नये म्हणून कायम मनाई मिळणेबाबत प्रस्तुतचा दावा वादी यांना मे. कोर्टामध्ये दाखल करणे भाग पडत आहे.

५. <u>दाव्यास कारण -</u>

यातील वादी यांनी प्रतिवादींनी दिले कधीही रद्द न होणाऱ्या वटमुखत्यारपत्राच्या आधारे दि. १०/०३/२०२२ इ. रोजी रजिस्टर दस्त नं. ६३२/२०२२ ने केले खरेदीपत्राअन्वये वादींना दावा मिळकतीमध्ये प्राप्त झालेल्या मालकीहक्काच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी दि. २०/१२/२०२५ इ. रोजी दावा मिळकतीमध्ये येवुन प्रतिवादींनी वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा केलेने प्रस्तुत दाव्यास कारण घडले आहे व आजही घडत आहे.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

६. <u>दाव्याचा तपशिल –</u>

रुपये पैसे

१000/- दावा हक्कज्ञापन होवुन मिळणेकरीता दाखल केलेने त्याची केलेली आकारणी सदरी दाखल.

१000/- दावा कायम मनाईकरीता दाखल केलेने त्याची केलेली आकारणी सदरी दाखल

१000/- दाव्यामध्ये तुर्तातुर्त मनाईची मागणी केलेने त्याची केलेली आकारणी सदरी दाखल

---------

३,000/- एकुण दाव्याची आकारणी केली असुन

-------- कोर्ट फी कायदा कलम ६ (vii) (j) (iv) शेडयुल २ आर्टीकल २३ एफ प्रमाणे केली असुन त्यावर जरुर तो कोर्ट फी स्टँम्प दिला आहे. दाव्याची कोर्टाच्या अधिकारासाठी आकारणी सुट व्हॅल्युएशन ॲक्टप्रमाणे केली आहे.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

७. वादींचा दावा मुदतीत आहे.

८. प्रतिवादी, दावा मिळकत व दाव्यास कारण मे. कोर्टाचे स्थळसिमेत घडले असलेने हा दावा चालविणेचा मे. कोर्टांना हक्क व अधिकार आहे.

९. वादींनी, प्रतिवादी विरुध्द दावा विषया संदर्भात यापुर्वी कोणत्याही कोर्टात अशा स्वरुपाचा दावा दाखल केलेला नाही अगर प्रलंबित नाही.

१०. <u>सबब, वादीची विनंती की –</u>

अ. वादींचा दावा कोर्ट खर्चासह मंजूर करणेत यावा.

आ. वादी यांनी दावा मिळकती संदर्भात दि. १०/०१/२०१९ इ. रोजी संचकारपत्र करुन त्यास आधीन राहुन प्रतिवादी यांनी वादींना रजिस्टर साठेखत नं. १९९०/२०२१ व कपल्ड विथ इंटरेस्टचे वटमुखत्यारपत्र त्याचा नं. १९९१/२०२१ ने करुन दिले होते. त्यास आधीन राहुन वादी यांनी रितसर खरेदीपत्र पुर्ण केले असुन दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रतिवादी यांनी ७/१२ पत्रकी असले नावाचा गैरफायदा घेवुन त्रयस्थ इसमांचे बरोबर दावा मिळकती संदर्भात कोणताही केलेला व्यवहार

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

वादी यांचेवरती बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होवुन मिळणेबाबत आदेश व्हावा.

इ. दावा मिळकत ही वादी यांनी रजिस्टर दस्त नं. ६३२/२०२२ ने दि. १०/०३/२०२२ इ. रोजी रितसर खरेदी केली असुन दावा मिळकतीमध्ये वादींच्या असले शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी हरकत, अडथळा करु नये म्हणून प्रतिवादी यांचे विरुध्द कायम मनाईची ताकिद होवुन मिळावी.

ई. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची दि. १०/०३/२०२२ इ. रोजीच्या रजिस्टर खरेदीपत्राने वादी यांना प्राप्त झालेल्या मालकीहक्काच्या शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी हरकत, अडथळा करु नये अगर ७/१२ पत्रकी असले नावाचा गैरफायदा घेवुन त्रयस्थ इसमांचा अधिकार, बँक बोजा यासारखे तत्सम कृत्य करु नये म्हणून प्रतिवादी अगर अन्य इसमांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाईचा आदेश व्हावा.

उ. दाव्याचा कोर्ट खर्च प्रतिवादी यांचेकडुन वादींना वसुल होवुन मिळावा.

ऊ. जरुर तर दावा दुरुस्तीस आवश्यकतेनुरुप मे. कोर्टाची परवानगी असावी.

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

ए. न्यायाच्या सर्व त्या अनुषंगिक दादी याच कामी वादी यांचे बाजुने देवविणेत याव्यात.

येणेप्रमाणे दावा असे.

सोबत वकीलपत्र, कागदांची यादी त्याप्रमाणे कागद, पत्तामेमा, तुर्तातुर्त मनाई अर्ज व दावा व तुर्तातूर्त मनाई अर्जाच्या प्रतिवादी करीता प्रती, हुकुमनामा प्रत जोडली आहे.

कोल्हापूर

दिनांक ०५/०२/२०२६ वादी नं. १

वादी नं. २ करीता व. मु. वादी नं. १

प्र ति ज्ञा

मी वादी नं. १ स्वत:करीता व वादी नं. २ संजय कृष्णराव जोशी व.व. ६३, धंदा- शेती/ नोकरी, रा. प्लॉट नं. २५४, सेक्टर नं. २१, निगडे प्राधिकरण, पुणे तर्फे व. मु. अभिजीत

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

प्रभाकर जोशी व.व. ५७, धंदा- शेती, रा. शाहुपार्क, राजेंद्रनगर, पाण्याच्या टाकीजवळ, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद दाव्यात कथन केलेला सर्व मजकुर हा माझे प्रामाणिक माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा कोल्हापूर दि. ०५/०२/२०२६ इ. रोजी

वादी नं. १ स्वत:करीता व वादी नं. २

करीता व. मु.

<u>ॲ फि डे व्हि ट</u>

मी वादी नं. १ स्वत:करीता व वादी नं. २ संजय कृष्णराव जोशी व.व. ६३, धंदा- शेती/ नोकरी, रा. प्लॉट नं. २५४, सेक्टर नं. २१, निगडे प्राधिकरण, पुणे तर्फे व. मु. अभिजीत प्रभाकर जोशी व.व. ५७, धंदा- शेती, रा. शाहुपार्क, राजेंद्रनगर, पाण्याच्या टाकीजवळ, कोल्हापूर देवाचे शपथेवर कथन करतो की, वर नमुद दाव्यात नमुद केलेला सर्व मजकुर हा माझे प्रामाणिक माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर

Assistant Superintendent
Civil Court, Sr. Dn., Kolhapur

आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मुाा कोल्हापूर दि. ०५/०२/२०२६ इ. रोजी

ॲफिडेव्हिट करणार यांना

मी ओळखतो ॲफिडेव्हिट करणार

ॲडव्होकेट वादी नं. १ स्वत:करीता व वादी नं. २

Adv. B.B. Kurane.

करीता व. मु.

## प्र ति ज्ञा

मी यातील ॲफिडेव्हिट करणार सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद दाव्यातील व त्याखालील ॲफिडेव्हिटमध्ये नमुद केलेला सर्व मजकुर हा माझे प्रामाणिक माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणुन केली प्रतिज्ञा आज मुाा कोल्हापूर दि. ०५/०२/२०२६ इ. रोजी

प्रतिज्ञा करणार

Solemnly Affirmed before me by
Shri Abhijit Prabhakar Joshi age 63
of Rajendranagar Kolhapur who is
identified by Shri Adv. B.B.
Kurane whom I know personally
Dated :- 5-2-26

Assistant Superintendent